**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन निर्णय क्रमांक - टिईएम-२०१२/प्र.क्र. ९८ (भाग -३)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जून, २०१२.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्रक्र. F. No. Western/२०१२/१-७२८८४२८७७७ dt. १०.०५.२०१२
२) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी ई-मेलद्वारे संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविलेली यादी.
३) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/एनजीसी/नवीन संस्था/मान्यता/२०१२/७१९ दिनांक २७ जून, २०१२

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संकेत स्थळावर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालील नमूद केलेल्या संस्थेस नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | जवाहर एज्युकेशन सोसायटीचे जवाहर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, सर्वे नं. ४८, गोवर्धन, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ २२२ | १) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलि कम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | २) इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ३) कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) सिव्हील इजिनिअरींग | ६० |
| | | ५) मॅकेनिकल इंजिनिअरींग | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/सलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण), यांचेकडे आवयक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबीची पूर्तता करावी.
५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.
६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांना आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.
७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व माहराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.
८) याशिवाय संचालक, (तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याआदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक (संचालकामार्फत)
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे (संचालकांमार्फत)
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली- ११० ००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरंस बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती/तांशि-४